# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,(दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे नं. ८३२ -ए, फायनल प्लॉट क्रमांक १७८ व १७९ बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.

Phone No. - ०२०-२९७०९६१७/ २९७०९३९६ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in


जा.क्र .मरापप/बापवि/TAIT/२०२५/ 1267
दिनांक:- २१/०३/२०२५

**प्रति,**

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
२) मा. विभागीय प्रसिद्धी उपसंचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई - ४०००३२
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई - २०
५) मा.संचालक, आकाशवाणी केंद्र,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिद्धी अधिकारी
७) मा. वृत्तपत्र संपादक

**विषय:** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ राखीव निकालाच्या सुनावणीबाबत.

**महोदय,**

दिनांक १०/११/२०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेतील ७८६ उमेदवारांचा निकाल काही कारणास्तव राखीव ठेवण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सुनावणी करीता संबंधित उमेदवारांना दि. २५/०३/२०२५ ते दिनांक ०४/०४/२०२५ पर्यंत सकाळी ११:०० वाजता उमेदवार निहाय दिलेल्या नियोजनाप्रमाणे त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता प्रस्तुत कार्यालयात उपस्थित राहणेबाबतचे पत्र संबंधित उमेदवारांच्या ई-मेल, एस.एम.एस. व परीक्षार्थ्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर सुनावणी बाबतचे प्रसिध्दी पत्रक यासोबत जोडलेले आहे.

सदर प्रसिध्दी पत्रकास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून आणि आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी **विनामूल्य** प्रसिद्धी यावी ही विनंती.

**आपली विश्वसू,**

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. खाजगी सचिव, मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुबई - ४०००३२.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
३) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०.
५) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
६) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, सर्व.
३) शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प)

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) परीक्षा - २०२४

## प्रसिध्दी पत्रक

**विषय:** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ राखीव निकालाच्या सुनावणीबाबत.

दिनांक १०/११/२०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेतील ७८६ उमेदवारांचा निकाल काही कारणास्तव राखीव ठेवण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सुनावणी करीता संबंधित उमेदवारांना दि. २५/०३/२०२५ ते दिनांक ०४/०४/२०२५ पर्यंत सकाळी ११:०० वाजता उमेदवार निहाय दिलेल्या नियोजनाप्रमाणे आपले म्हणणे मांडण्याकरीता प्रस्तुत कार्यालयात उपस्थित राहणेबाबतचे पत्र संबंधित उमेदवारांच्या ई-मेल, एस.एम.एस. व परीक्षार्थ्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी आपणास कळविण्यात आलेल्या दिवशी सकाळी ११:०० वाजता स्वखर्चाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या ठिकाणी वेळेत उपस्थित रहावे. सदर दिवशी आपण समक्ष हजर राहीला नाहीत तर आपणास सदर प्रकरणी काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून त्याबाबत उपलब्ध पुराव्याच्या आधारे निर्णय घेण्यात येईल व तो निर्णय आपणावर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

सुनावणीच्या वेळी आपण आपले आधारकार्ड, शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ मधील उत्तरपत्रिकेची कार्बन कॉपी, परीक्षेचे प्रवेशपत्र, पुराव्यासाठी परीक्षेच्या संदर्भातील आवश्यक असलेले अनुषंगीक सर्व कागदपत्रे, संदर्भात गुणपत्रक/प्रमाणपत्र तसेच फोटो ओळखपत्र (चालक परवाना / बँक पासबुक / निवडणूक ओळखपत्र / पासपोर्ट यापैकी कोणतेही एक) यासह स्वत: उपस्थित राहावे. सुनावणीच्या वेळी आपल्या वतीने अन्य कोणालाही उपस्थित राहता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पुणे**
**दिनांक: २१/०३/२०२५**

**(अनुराधा ओक)**
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०१,